द्रव्यगुण मंथन

# कुष्ठ व कोष्ठ (कुलिंजन) नामसाधर्म्य व गुणसाधर्म्य

वैद्य मदन टोंगे,नांदेड.

काष्ठौषधी दुकानात गेल्यानंतर बऱ्याचवेळा जेव्हा आपण कुष्ठ किंवा कोष्ठ या नावाने द्रव्य मागितले असता आपणास कोष्ठकुलिंजन अथवा पुष्करमूळ हे दिले जाते. यातील मराठी नावातील साम्यामुळे असे होते.

आयुर्वेदात वर्णिलेले कुष्ठ हे द्रव्य Botanically Saussurea Lappa जे हिमालयात उत्पन्न होते याचे मराठी नाव उपलेट असे आहे. सध्या कुष्ठ हे indangered species असल्याने दुर्मीळ झाले आहे. कुष्ठाचे प्रतिनिधीद्रव्य हे पुष्करमूळ सांगितले आहे. पुष्करमूळ हे सुध्दा हिमालयातच उत्पन्न होते Botanically ते Enula racimosa होय. सध्या कुष्ठ म्हणुनही पुष्करमूळच विकले जाते. मराठी मध्ये, कुलिंजन ज्यास भावप्रकाशाने महाभारी वचा असे नामकरण केले आहे त्यास कोष्ठ कुलींजन असे संबोधले (बोलीभाषेत) जाते Botanically ते Alpinia galanga जे की Zinziberaceae चे द्रव्य आहे. याचे पर्यायी नावे मलयवचा गंधमूल असे आहेत. हे थोडे सुगंधी अशा प्रकारचे द्रव्य आहे. भावमिश्राने यास 'सुगंधा' व 'उग्रगंधा' असेही संबोधले आहे.

आयुर्वेदीय ग्रंथात प्रथम भावप्रकाशाने याचा उल्लेख केला आहे. त्याच्या पूर्वीच्या काळातील ग्रंथात याचा उल्लेख नाही याचे आकारानुसार दोन प्रकार पडतात. एक स्थुल आकाराने मोठे 'स्थुलग्रंथी' जे की प्रामुख्याने भारतात दक्षिणेस उत्पन्न होते त्या Alpinia galangal व जे आकाराने लहान ते भारतात आयात होते हे चीन व south east asia countries कडून भारतात येते ते Lessar galangal किंवा Alpinia officinacoum होय

दाक्षिणात्य लोक हे कुलिंजन यासच आयुर्वेदातील प्रमुख द्रव्य 'रास्ना' असे मानतात. तेलगुमध्ये यासच क्षुंपा रास्ना (मोठी रास्ना) असे म्हणतात. याचे पान 'एलापत्र सदृश्य' असेच असतात व मूळ हे सुगंधी 'सुगंधमूला' असे असतात, जे वर्णन रास्नाच्या वर्णनाशी मिळते जुळते आहे.

'सुगंधमूला',. एलापर्णी रास्ना शिवदत्त रास्ना तु त्रिविधा प्रोक्ता मूलं पत्रं तृणं तथा ।ज्ञेयौ मूलदलौ श्रेष्ठो तृणरास्ना तु मध्यमा । रा.नि.

केरळ मधे रास्नादिचूर्ण हे तालुप्रदेशी स्नाना नंतर (शिरस्नान) हे घासतात (तौलधारणा) जे की जलदोष, सर्दी, पडसे, प्रतिबंधासाठी वापरतात. आपल्याकडे सुध्दा बाळंतपणात बाळ जन्मलानंतर स्नानानंतर ते टाळुवर लावण्याची पध्दत आहे. गुणानुसार हे कफवातशामक आहे व ते सर्दी, पडसे, प्रतिश्यांय, श्वास, कास आदी विकारात उपयुक्त आहे. कुलिंजन अवलेह हा प्रतिश्यावरचा कल्प सांगितला आहे. तशी Zinziberaceae Family तील बरीच द्रव्ये ही श्वास, कास, प्रतिश्याय व वात विकार संधिगतवात, आमवात यावर उपयुक्त आहेत. उदा. शुंठी, हरिद्रा, एला, तवक्षीर (curcuma angustifolia)

कुलींजन हे उत्तेजक stimulant कफनिस्सारक दीपक, पाचक, वातानुलोमक तथा वृष्य आहे. अल्प मात्रेतही हे श्वसनलिका विस्फारक आहे गलसंरभ श्वास,कास,प्रतिश्यायात मधाबरोबर चाटणे उपयुक्त. संधीवात व आमवातात ही हे अतिशय गुणकारी आहे.

**कुष्ठ saussarea lappa**

कुष्ठ हे औषधीद्रव्य